

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha,Kolhapur

(Affiliated to Shivaji University,Kolhapur)

**Sansthamata Sushiladevi Salunkhe Mahila Shikshanshastra Mahavidyalaya,Tasgaon Dist.Sangli**

---------------------------------------------------------------------------

# 2.4.7 DOCUMENTS

| Sr.No | Documents |
|---|---|
| 1 | Samples of assessed assignment for theory courses of different programmes |

Roll No-37

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार "

– शिक्षणमहर्षी प. पू. डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित,

# संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव, जि. सांगली





**प्रात्यक्षिकाचे नांव :** अध्ययन व अध्यापन प्रपाठ

**बी. एड. सत्र :** II

प्रशिक्षणार्थीचे नांव : ऊर्मिला रविंद्र पाटील

हजेरी क्रमांक : 37

मार्गदर्शक प्राध्यापक : प्रा. डॉ. ए. एस चिखलीकर

बी. एड. वर्ष : २०२१-२२

ॐकार/कराड.८१८३९९९१७१

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | घटक | दिनांक | पृष्ठ क्रमांक | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| १. | अध्यापनाची सुत्रे म्हणजे काय उदाहरणासह स्पष्ट करा. | | 1-4 | |
| २. | अध्ययनाचे स्तर सांगून आकलन स्तराची उद्दिष्टे व स्वरुप स्पष्ट करा. | | 5-10 | [signature] |
| ३) | आचारसंहीता म्हणजे काय अध्यापन व्यवसायची आचारसंहीता तत्वे स्पष्ट करा. | | 11-19 | |

1) अध्यापनाची सूत्रे म्हणजे काय ? अध्यापनाची सुत्रे सांगून सोप्याकडून कठीणाकडे व विशेषाकडून सामान्याकडे ही अध्यापन सूत्रे उदाहरणासह स्पष्ट करा.

अध्यापनाची सूत्रे व्याख्या :-

maxim या शब्दाचा इंग्रजी अर्थ, widely accepted role of conduct of general truth briefly expressed आहे. याचा अर्थ वर्तनाबद्दल सर्वसामान्यतेने स्वीकारलेला नियम अथवा थोडक्यात व्यक्त केलेले सर्व सामान्य तत्व म्हणजे सुत्र होय.

अध्यापन करताना अध्यापनाची सुत्रे शिक्षकाने लक्षात ठेवणे आवश्यक आहे. त्या सुत्रांचे अध्यापनात पालन केल्यास अध्यापन यशस्वी होते. ही सूत्रे अध्यापन कार्यात मार्गदर्शन करतात. या सुत्रांचा उपयोग अध्ययनार्थीचे वय त्यांची मानसिक परिपक्वता, विषयाचे काठीण्य इत्यादींचा विचार करून करावा.

अध्यापनाची सुत्रे :-

1) ज्ञाताकडून अज्ञाताकडे :-

विद्यार्थ्यांना कोणतेही नवीन ज्ञान देण्यापूर्वी त्यांना त्याबाबत कितपत ज्ञान आहे याची माहीती करून घेणे आवश्यक असते. ज्ञात म्हणजे माहीत असलेले अज्ञात म्हणजे माहीत नसलेले नविन भाग शिकविण्यास सुरुवात करण्यापूर्वी त्या ज्ञानासंबंधी विद्यार्थ्यांना जे ज्ञान परिचित असेल त्या भागापासून विषयाचा प्रारंभ करावा. प्रारंभ करताना या सुत्राचा उपयोग उपयुक्त ठरतो. तसेच विषय विवेचनामध्येही हे सूत्र उपयोगी ठरते.

Sansthamata Sushiladevi Salunkhe Mahila Shikshanshastra Mahavidyala Tasgaon, Dist. Sangli. Pin. 416 312.

I/c. Principal,
Sansthamata Sushiladevi Salunkhe
Mahila Shikshanshastra Mahavidyala,
Tasgaon, Dist. Sangli. Pin. 416 312.

2) मूर्तकडून अमूर्ताकडे (Concrete to Abstract)

मूर्त म्हणजे इंद्रियागोचर होय. आपण विविध ज्ञानेंद्रियाकडून अनुभव घेत असतो. ज्या गोष्टी ज्या गोष्टी आपण प्रत्यक्ष अनुभवू शकतो त्या गोष्टी मूर्त होत. ज्या बाबी केवळ मानसिक व भावनिक स्तरावर अनुभाव्या लागतात त्या अमूर्त होत. मूर्त बाब समजणे सोपे असते पण अमूर्त बाब समजण्यासाठी काही प्रमाणात मनाचा विकास झालेला असणे, मनाची परिपक्वता झालेली असणे आवश्यक असते.

मूर्ताकडून अमूर्ताकडे जाणे म्हणजे प्रत्यक्ष वस्तू किंवा प्रतिकृती दाखवून विषयाचे विवेचन करणे. वस्तूंच्या अनुपस्थीत त्या संबंधी विचार करणे हे प्रारंभिक स्तरावर अध्ययनार्थीला जड जाते.

3) सोप्या कडून कठीणाकडे (सुगमापासून संकीर्णाकडे) :-

कोणताही विषय शिकविताना त्यातील सोप्या भागाकडून सुरुवात करावी व हळूहळू कठीण भागाकडे वळावे विषयाचा प्रारंभ सहज सोप्या, सुलभ समजता येण्याजोग्या भागापासून करावा सुगम वा सोपे या अर्थ एकाच चलाचा परिणाम होणारी बाब. जेव्हा एखाद्या बाबीवर अनेक चलांचा परिणाम होतो तेव्हा ती बाब गुंतागुंतीची बनते. आपल्याला नवीन विषय कळतो आहे ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होणे आवश्यक आहे ही भावना निर्माण करण्यासाठी सोप्या बाबींनी प्रारंभ करणे आवश्यक आहे.

4) विशिष्टाकडून सामान्यकडे :-

अध्यापन करीत असताना एखादा नियम किंवा तत्व शिकवायचे अध्यायनास नियम एकदम सांगू नये त्या विशीष्ट नियमाची वेगवेगळी उदाहरणे द्यावीत व त्यातून सर्वसामान्य नियम कसा तयार होईल हे विद्यार्थ्यांकडून काढून घ्यावे विद्यार्थ्यांपुढे अनेक विशेष बाबी ठेवून त्यांच्यातील समानता व विषमता शोधण्यास सांगून त्यातून सर्वसामान्य नियम तयार करण्यास सांगावे. विशेष बाबी मूर्त असतात. त्यामुळे त्या समजणे अवघड असते एकदा नियमांचा शोध लागला की त्या नियमाचा इतर समान बाबतीत वापर करता येणे यास अवगामी पद्धत म्हणतात.

5) पूर्णाकडून अंशाकडे / स्थूलाकडून सुक्ष्माकडे :-

कोणत्याही गोष्टीचे स्थूल स्वरुपाचे का होईना पण संपूर्ण दर्शन विद्यार्थ्यांना घडविले पाहीजे अध्यापनात या सूत्राच्या वापर करताना कोणत्याही गोष्टीची पूर्ण कल्पना द्यावी आकलनवादी मानसशास्त्रावर आधारित हे तत्व आहे कोणताही विषय व कौशल्य शिकवत असताना प्रथम त्या विषयीचे संपूर्ण चित्र विद्यार्थ्यांकडे उभे करुन नंतर त्यातील घटकांच्या तपशीलाकडे वळावे.

6) अनुभवजन्य ज्ञाताकडून तर्कशुद्ध ज्ञानाकडे :-

ज्ञानग्रहणाचे मानवास तीन मार्ग उपलब्ध असतात पहिला म्हणजे ज्ञानेंद्रीयांच्या मार्फत, प्रत्यक्ष अनुभवाद्वारे ज्ञान प्राप्त करणे दुसरा मार्ग म्हणजे तर्कशक्तीने, विचाराद्वारे प्रत्यक्ष अनुभव न घेताही ज्ञान प्राप्त करण्याचा प्रयत्न करणे दुसऱ्या मार्गाचा अवलंब करताना विचार शक्तीचा विकास झालेला असणे व त्यासाठी काही प्रमाणात औपचारिक अनौपचारिक शिक्षण झालेले असणे वा बुद्धीचा विकास झालेला असणे गरजेचे असते. हा विकास अर्थातच

अनुभवजन्य ज्ञाताकडून होत असतो.

7) अंशाकडून पूर्णत्वाकडे :-

पूर्णाकडून अंशाकडे याच्या एकदम विरुद्ध टोकाचे सूत्र म्हणजे अंशाकडून पूर्णत्वाकडे जाणे ज्यावेळी विद्यार्थ्यांच्या तर्कशक्तीचा विकास झालेला असतो तेव्हा या सूत्राचा उपयोग करावा.

I) सोप्याकडून कठीणाकडे :-

जे लवकर समजते ते सोपे आणि जे समजण्यास वेळ लागतो ते अवघड असे सर्वसामान्यपणे सांगता येईल परंतु एखादे काम सोपे का अवघड ते विद्यार्थ्यांच्या वयावर बौद्धीक क्षमतेवर व पूर्णानुभावर अवलंबून असते सोपे वा कठीण ही सापेक्ष संकल्पना आहे.

उदाहरणार्थ :- नकाशावाचन करणे हे पाचवीच्या विद्यार्थ्यांना अवघड जाते परंतु १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी सोपे आहे विद्यार्थी सोपे लवकर शिकतात यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो म्हणून सोपे घटक शिक्षकांनी प्रथम शिकवावे.

II) विशेषाकडून सामान्याकडे :-

विशेष अशा गोष्टीकडून विविध उदाहरणांद्वारा सामान्य नियम तयार करणे एखादा सामान्य नियम सिद्धांत सूत्र शिकवितांना प्रथम विशिष्ट उदाहरणावर चर्चा करणे त्या आधारे सामान्यीकरण करून घ्यावे म्हणजे आधी नियम, तत्व सिद्धांत किंवा सूत्र तयार करून घ्यावे असा या सूत्राचा अर्थ आहे.



प्र.२ अध्ययनाचे स्तर सांगून आकलन स्तराची उद्दीष्टे व अध्यापन स्वरूप स्पष्ट करा.

→ अध्यापनाचे स्तर (Levels of teaching)

गॅनेच्या मते सर्व अध्ययन सारखे नसते त्यांनी अध्ययनाचे संकेत, अध्ययन उदीपक, प्रतिसाद अध्ययन, श्रृंखला अध्ययन, शब्द साहचर्य, गुणित भेदाभेदन अध्ययन, संबोध अध्ययन तत्वाचे किंवा नियमांचे अध्ययन आणि समस्या उकलन हे अध्ययनाचे आठ प्रकार किंवा स्तर किंवा पायऱ्या सांगितल्या आहेत. या विविध स्तरानुसार अध्यापन करावे लागते तसेच उद्दिष्टानुरूप अध्यापन हे बदलत असते या सर्वांचा विचार करून मानसशास्त्रांनी आणि शिक्षण तज्ञांनी अध्यापनाचे तीन स्तर सांगितले आहेत. बौद्धीक शक्तीच्या उपयोगाच्या दृष्टीने याला विचारहीन, विचारयुक्त, अतिविचार युक्त मानले आहे अध्यापनाच्या या तीन स्तरांना बौद्धीकता आणि विचारयुक्ततेच्या दृष्टीने जे तुलनात्मक स्थान प्राप्त होऊ शकते त्यांची कल्पना खालील आकृतीवरुन येते




| | | |
|---|---|---|
| स्मृतिस्तर | → बोधस्तर | → चिंतनस्तर |

प्राथमिक पायरी → अध्यापन ← अंतिम पायरी

मॉरिस एल बिग्गी यांनी अध्यापन स्तराविषयी असे मत व्यक्त केले आहे की, teaching Learnig situation may be classified on a continum which range from least thoughtful to most thoughtful modes of operation.

स्मृतिस्तरावरुन विद्यार्थ्यांस चिंतन स्तरापर्यंत न्यावयाचे हाच अध्यापनाचा मुख्य हेतू होय.

* अध्यापनाचे स्तर :-

(अ) स्मृतिस्तरावरील शिक्षण (memory level of teaching)
(आ) आकलन / बोध स्तरावरील अध्यापन
(इ) विमर्श / चिंतन पातळीवरील अध्यापन

आकलन / बोध स्तरावरील अध्यापन :-

व्याख्या: आकलन ही अशी स्थिती आहे की माहिती पूर्णपणे जाणून घेतली जाते व तिचा इतर ज्ञानाशी संबंध जोडला जातो. विद्यार्थ्यांने एखादा शास्त्रीय नियम व तत्वे यांचे स्पष्टीकरण आपल्या शब्दात दिले तर त्याला त्याचे आकलन झाले असे म्हणता येईल.

• आकलन पातळीवरील अध्यापनाची उद्दिष्टे :-

i) प्राप्त माहितीचा संबंध जाणण्यास व अर्थ लावण्यास मदत करणे
ii) विद्यार्थ्यांस आवश्यक माहिती मिळवण्यास मदत करणे.
iii) प्राप्त माहितीतील साम्यपणा व विरोधीपणा जाणून घेण्यास मदत करणे.



5) नकाशे, तक्ते, आलेखाचा अन्वयार्थ काढण्यास मदत करणे
6) शिकलेल्या घटकांचे महत्त्व जाणून घेण्यास मदत करणे.
7) दिलेल्या घटकातील चूक शोधण्यास मदत करणे.
8) प्राप्त सामान्यीकरण तथ्ये, नियम व तत्वे यांचा वापर नवीन माहिती मिळविण्यासाठी करणे अथवा दैनंदिन जीवनात करण्यास मदत करणे
9) अर्जित तथ्यांचा संबंध पाहणे, अर्थ जाणणे व अर्जित तथ्यांमधील समानता असमानता ओळखणे.

* आकलन पातळीवरील अध्यापन स्वरूप :-

i) पाठ्यांशाचे स्वरुप आणि सादरीकरण
ii) कार्यनीती → i) प्रोत्साहन देणे
ii) पूर्वज्ञान जागृती करणे
iii) आकलन कृतीवर ताबा मिळवणे
iv) कार्यनिती प्रशिक्षण, व्यवस्थितपणा

* पाठ्यांशांचे स्वरूप व त्याचे सादरीकरण :-

या स्तरावरील पाठ्यांश हा काहीसा संरचित व क्रमानुसार सादर केला जातो. एका बाजूला या पाठ्यांशाची पूर्वज्ञानाशी सांगड घातली जाते. तसेच नवीन ज्ञान मिळविण्यासाठी त्याचा उपयोग व दैनंदीन जीवनात उपयोजन कसे करावे हे शिकविले जाते.

*) कार्यनीती :- L.W. Aderson यांनी International Encyclopedia of teaching and teacher education मध्ये आकलन पातळीवरील अध्यापन कसे करावे याची चर्चा केली आहे.

* प्रोत्साहन देणे :- आकलन पातळीवरील अध्यापनात अशा विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले पाहीजे. एका बाजूला विद्यार्थ्यांना नवीन माहितीचा पूर्वज्ञानाशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी

पुरेसे मार्गदर्शन केले पाहीजे. त्याचबरोबर त्यांना विचार करण्यास स्वातंत्र्यही दिले पाहीजे.

ii) पूर्वज्ञान जागृत करणे :-

अर्थपूर्ण अध्यापनात विद्यार्थ्यांना नवीन ज्ञानाचा पूर्वज्ञानाशी संबंध जोडता आला पाहीजे. यासाठी शिक्षण अग्रत संघटक प्रतिमानाचा वापर करू शकतात. तसेच पूर्वज्ञानाचा गोषवारा घेऊ शकतात तसेच उदाहरणाचा वापर करून पूर्वज्ञानाची जागृती केली जाऊ शकते.

iii) आकलन कृतीवर ताबा मिळविणे:

विद्यार्थी काय करू शकतात व ते प्रत्यक्षात काय करतात या मध्ये फरक आहे. विद्यार्थ्यांच्या समोर केवळ व तयार ज्ञान देण्यापेक्षा शिक्षकांनी नवीन चौकस अध्यापन करावे.

iv) कार्यनिती प्राशिक्षण :-

विद्यार्थ्यांच्या अयोग्य आहे उदा. विद्यार्थ्यांना मुख्य माहीती-वर भर देण्यास सांगणे व त्याचा इतर ज्ञानाशी असंबंध जोडण्याचे प्राशिक्षण, वेळेचे नियोजन, एकाग्रता, स्वयं अध्ययन पद्धतीसारख्या गोष्टी विद्यार्थ्यांना शिकविल्या पाहीजेत.

v) व्यवस्थितपणा :-

आकलनाचा संबंध हा दैनंदिन लक्षात घेतले पाहीजेत शिक्षक व विद्यार्थी याच्यात आंतरक्रिया झाल्या पाहीजेत. सारांश सांगणे, आकृती करणे, प्रश्न विचारणे याद्वारे आंतरक्रिया केल्या पाहीजेत.

- अध्ययन ही दीर्घकाळ व विचार केंद्रीत प्रक्रिया बनवा.
- निरंतर मूल्यमापन केले पाहीजे.
- प्रभावी सादरीकरणाद्वारे अध्ययनाला स्नाह्य केले पाहीजे.
- आंतरशास्त्रीय व शाखा अंतर्गत समन्वय साधला पाहीजे.
- अध्ययन संक्रमणाचे शिक्षण द्यावे.



- अध्ययन संक्रमणाचे शिक्षण द्यावे.
- विद्यार्थ्यांच्या विकास घटकाकडे अवधान द्यावे.

आ) शिक्षकाची भूमिका :-

स्मृतिस्तरावरील अध्यापनाप्रमाणेच काही प्रमाणात शिक्षक हा मुख्य असतो. या स्तरावरसुद्धा विषय केंद्रीत शिक्षण आहे. विद्यार्थ्यांसमोर विषय सादर करण्याकडे लक्ष द्यावे लागते. यातून ज्ञान व आकलन पातळीवरील उद्दीष्ट्ये साध्य होतील.

4) विद्यार्थ्यांची भूमिका :-

या स्तरावरील विद्यार्थी समजून ज्ञान आत्मसात करतो. क्रियाशील असतो. समजले नाही तर स्पष्ट करण्याची मागणी करतो. बोधस्तरावरील शिक्षण पूर्णपणे प्रयोजनपूर्व असते. विद्यार्थ्यांना शिक्षकाने तयार केलेल्या चौकटीतच त्याला करावी लागते.

5) प्रेरणेचे स्वरूप :- या ठिकाणी प्रेरणा स्त्रोत बाह्य असतो. तसेच काही प्रमाणात आंतरिक प्रेरणाही कार्यरत असते.

7) आकलन पातळीवरील अध्यापनासाठी मॉरिसन यांनी सांगितलेले प्रतिमान.

1) उद्देश :- आकलन पातळीवरील अध्यापनाचा उद्देश हा विद्यार्थ्यांनी संकल्पनेवर प्रभुत्व निर्माण करावे. यावर शिक्षक भर देतात.

2) संरचना :- मॉरिसन यांनी आकलन पातळीवर अध्यापनाचे पाच स्तर सांगितले आहेत.

(क) शोध :- यामध्ये पुढील कृतीचा समावेश होतो.

- प्रश्न विचारुन पूर्व ज्ञान जागृती करणे

- मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून विषयज्ञानाचे विश्लेषण करणे
- नवीन ज्ञान किंवा विषयाचे सादरीकरण कसे करणार हे ठरविणे.

ख) सादरीकरण:- या पायरीवर शिक्षक हा अधिक कृतिशील बनतो.
- शिक्षक पाठ्यांश छोट्या घटकात सादर करतो.
- जो पर्यंत बऱ्याच विद्यार्थ्यांना पाठ्यांशाचे आकलन होत नाही तोपर्यंत शिक्षकासिद्धालोकन करतात.

ग) आत्मसात करणे:-
सादरीकरणानंतर शिक्षक या निष्कर्षावर येतात की विद्यार्थ्यांनी नवीन ज्ञान मिळवले आहे. आकलनासाठी शिक्षक विद्यार्थी यांना समान संधी उपलब्ध करून देतात.

(घ) संघटन :- Assimilation या कालावधी हा प्रमुख चाचणीचा असतो. प्रभुत्व चाचणी नंतर विद्यार्थी पाठ्यांशाचा स्वरूपानुसार त्याचे संघटन किंवा पाठांतर करू लागतात. सर्व विद्यार्थी स्वतःच्या भाषेत पाठ्यांश लिहितात.

(च) पाठांतर :- पाठांतर ही आकलन पातळीवरील शेवटची पायरी आहे येथे विद्यार्थी पाठ्यांश शिक्षक व सहकार्यासमोर म्हणून दाखवतात.

3) सामाजिक प्रणाली:- आकलन पातळीवर सामाजिक प्रणाली ही सतत बदलत असते. सादरीकरणाच्या टप्प्यावर स्मृतीस्तरा प्रमाणे शिक्षक हा जास्त क्रियाशील असतो.



4) साहाय्यभूत प्रणाली:-
सहाय्यभूत प्रणाली स्थिर नसते. ती सतत बदलत असते. विद्यार्थ्यांना Assimilation मध्ये प्रयोग करण्यासाठी सादरीकरणाची परिक्षा पास व्हावी लागते. तसेच Assimilation ची चाचणी पास झाल्यावर ते संघटन व पाठांतरात प्रवेश करतात. संघटनानंतर लेखी चाचणी घेतली जाते व पाठांतरात तोंडी परिक्षा घेतली जाते.

प्र.3 आचार संहिता म्हणजे काय ? अध्यापन व्यवसायाची आचारसंहिता तत्वे स्पष्ट करा.
आचारसंहिता हे एका अर्थाने कर्तव्यशास्त्र आहे. आचार संहिता हे व्यवसायाचे नीतीशास्त्र असते. आपल्या व्यवसायात काही नियम व बंधने असणे आवश्यक असते. उद्याचा नागरिक घडविण्यात शिक्षकांना महत्वाची भूमिका बजावावी लागते. ही भूमिका योग्य रितीने बजावण्यासाठी शिक्षकांकडून विशिष्ट वर्तनाची अपेक्षा समाज करीत असतो. शिक्षकी ही एक व्यवसाय आहे. या व्यवसायातील जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी व व्यवसायाचा दर्जा उंचवण्यासाठी काही नियम निश्चित करावे लागतात. असे निश्चित केलेले नियम आणि तत्वे म्हणजेच त्या व्यवसायाची आचार संहिता होय.

- व्यवसायात असणाऱ्या व्यक्तिच्या वर्तनविषयीचे नियम आणि त्या नियमांच्या संचाना व्यावसायीक आचारसंहीता म्हणतात. आचार संहीता म्हणजे कर्तव्य पार पाडण्याची नियमांचे व तत्वांचे पालन करणे होय.
- व्यवसायांच्या नियमांची आणि तत्वांची निश्चीती म्हणजे आचार संहिता होय.

शिक्षकी व्यवसाय व्यवस्थितपणे चालावा आणि या व्यवसामध्ये गुणात्मक व व्यावसायिक स्वास्थ्य टिकून रहावे यासाठी जे नितीनियम तयार करण्यात आले आहेत त्याला शिक्षकी व्यावसायाची आचारसंहिता असे म्हणतात.

* AIFTA आणि NEA

आपल्या व्यवसायात शिक्षकांचा विद्यार्थी, पालक, सहशिक्षक, पर्यवेक्षक, मुख्याध्यापक, समाजातील अन्य यांच्याशी संबंध येत असतो. शिक्षकांनी या घटकांशी कसे वागावे, कोणता आचार योग्य मानावा. कोणकोणती बंधने पाळावीत आपले वर्तन कसे नियंत्रित करावे या संबंधीच्या विचार आचारसंहीतेत अपेक्षित असतो. विनोबाजींच्या मते आचारसंहिता निर्माण करणे ही जबाबदारी शिक्षक संघटनाची किंवा आचार्य कुलाची आहे. आपल्या देशात All india federation of teacher Asscociation (AIFTA) या संस्थेने तसेच अमेरिकेत National education association या संस्थेने शिक्षण व्यवसायासाठी आचारसंहिता तयार केली आहे. यातील तत्त्वे खालील प्रमाणे

1. लोकशाही समर्थ व निकोप करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत क्षमता लक्षात घेऊन विकास करणे

2. शिक्षकाने आपल्या प्रभावी अध्यापनासाठी विद्यार्थ्यांची कौटुंबिक माहीती व पालकांचे सहकार्य घेऊन त्याचे सामाजीकरण करून त्यांना चांगल्या पद्धतीने घडवावे

3) शिक्षक शाळा यांच्यामध्ये चांगल्या आंतरक्रिया घडवून आणणारा असावा. समाज व शाळा यांच्यात अतूट नाते निर्माण करणारा असावा



4) शिक्षक स्वतःच्या व्यवसायाच्या आदर करणारा असावा जबाबदारीची जाणीव ठेवून श्रद्धेने व निष्ठेने काम करणारा असवा.

5) शिक्षकाने समाजमान्य वर्तन केले पाहीजे. समाजाची बंधने पाळली पाहीजे

6) शिक्षकांनी आपल्या सहकारी शिक्षकांशी, मुख्याध्यापकांशी प्रेमाचे सहकार्याची सलोख्याचे संबंध ठेवावे सहकारी शिक्षकाविषयी अनुदगार काढू नयेत.

7) आपल्या व्यवसायाचा दर्जा सुधारण्यासाठी सतत प्रयत्न करावा

8) शिक्षकी व्यवसाय स्वीकारल्या नंतर सर्व अटी व नियमाचे पालन केले पाहीजे. आपल्यापेक्षा ज्ञानाने, वयाने श्रेष्ठ असणाऱ्या शिक्षकांना मान दयावा. आदर बाळगावा.

9) शिक्षकाने कोणत्याही प्रकारचे व्यसन करू नये. अशा प्रकारे शिक्षकी व्यवसायाचा दर्जा उंचवण्यासाठी जबाबदारीने कार्य पार पाडण्यासाठी वरील प्रमाणे निती तत्वांचे नियम सांगितले आहेत त्याचे पालन करणे आवश्यक आहे

1) आचार संहितेत सांगीतले पहिले तत्व ज्ञानदानाच्या जबाबदारीविषयीचे आहे. शिक्षक बालक, किशोर, कुमार प्रौढ यांना ज्ञान व कौशल्ये प्राप्त करून देण्याच्या कार्यात मदत करीत असतो. सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणे तसेच त्यांच्यावर लोकशाही जीवनपद्धतीचा संस्कार करणे व चांगले नागरिक निर्माण करणे ही शिक्षण व्यवसायाची जबाबदारी आहे. यात विदयार्थ्यांना समान वागणूक दिली जावी. खाजगी शिकवणीबाबत निर्धारित नियमांचे पालन करण्यास सुचविले आहे

सामाजिक कर्तव्याची जाणीव शिक्षकांनी ठेवली पाहीजे. समाजमान्य वर्तन शिक्षकाकडून घडावे. समाजाचा नैतिक बौद्धीक व आध्यात्मिक स्तर उंचवण्याचा प्रयत्न

शिक्षकी व्यवसाय व्यवस्थितपणे चालावा आणि या व्यवसामध्ये गुणात्मक व व्यावसायिक स्वास्थ्य टिकून राहावे यासाठी जे नितीनियम तयार करण्यात आले आहेत त्याला शिक्षकी व्यवसायाची आचारसंहिता असे म्हणतात.

## * AIFTA आणि NEA

आपल्या व्यवसायात शिक्षकांचा विद्यार्थी, पालक सहशिक्षक पर्यवेक्षक, मुख्याध्यापक, समाजातील अन्य यांच्याशी संबंध येत असतो. शिक्षकांनी या घटकांशी कसे वागावे, कोणता आचार योग्य मानावा. कोणकोणती बंधने पाळावीत आपले वर्तन कसे नियंत्रित करावे. या संबंधीचा विचार आचारसंहीतेत अपेक्षित असतो. विनोबाजींच्या मते आचारसंहिता निर्माण करणे ही जबाबदारी शिक्षक संघटनाची किंवा आचार्य कुलाची आहे. आपल्या देशात All india fedration of teacher Asscociation (AIFTA) या संस्थेने तसेच अमेरिकेत National education association या संस्थेने शिक्षण व्यवसायासाठी आचारसंहिता तयार केली आहे. यातील तत्वे खालील प्रमाणे

1. लोकशाही समर्थ व निकोप करणाऱ्या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत क्षमता लक्षात घेऊन विकास करणे.
2. शिक्षकाने आपल्या प्रभावी अध्यापनासाठी विद्यार्थ्यांची कौटुंबिक माहीती व पालकांचे सहकार्य घेऊन त्याचे सामाजीकरण करून त्यांना चांगल्या पद्धतीने घडवावे.
3) शिक्षक शाळा यांच्यामध्ये चांगल्या आंतरक्रिया घडवून आणणारा असावा. समाज व शाळा यांच्यात अतुट नाते निर्माण करणारा असावा



4) शिक्षक स्वतःच्या व्यवसायाचा आदर करणारा असावा जबाबदारीची जाणीव ठेवून श्रद्धेने व निष्ठेने काम करणारा असवा.
5) शिक्षकाने समाजमान्य वर्तन केले पाहीजे. समाजाची बंधने पाळली पाहीजे.
6) शिक्षकांनी आपल्या सहकारी शिक्षकांशी, मुख्याध्यापकांशी प्रेमाचे सहकार्याची, सलोख्याचे संबंध ठेवावे सहकारी शिक्षकविषयी अनुदगार काढू नयेत.
7) आपल्या व्यवसायाचा दर्जा सुधारण्यासाठी सतत प्रयत्न करावा
8) शिक्षकी व्यवसाय स्वीकारल्या नंतर सर्व अटी व नियमांचे पालन केले पाहीजे. आपल्यापेक्षा ज्ञानाने, वयाने श्रेष्ठ असणाऱ्या शिक्षकांना मान दयावा. आदर बाळगावा.
9) शिक्षकाने कोणत्याही प्रकारचे व्यसन करू नये. अशा प्रकारे शिक्षकी व्यवसायाचा दर्जा उंचवण्यासाठी जबाबदारीने कार्य पार पाडण्यासाठी वरील प्रमाणे निती तत्वांचे नियम सांगितले आहेत त्याचे पालन करणे आवश्यक आहे.
10) आचार संहितेत सांगितले पहिले तत्व ज्ञानदानाच्या जबाबदारीविषयीचे आहे. शिक्षक बालक, किशोर, कुमार प्रौढ यांना ज्ञान व कौशल्ये प्राप्त करून देण्याच्या कार्यात मदत करीत असतो. सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणे तसेच त्यांच्यावर लोकशाही जीवनपद्धतीचा संस्कार करणे व चांगले नागरिक निर्माण करणे ही शिक्षण व्यवसायाची जबाबदारी आहे. यात विद्यार्थ्यांना समान वागणूक दिली जावी. खाजगी शिकवणीबाबत निर्धारित नियमांचे पालन करण्यास सुचविले आहे.

सामाजिक कर्तव्याची जाणीव शिक्षकांनी ठेवली पाहीजे. समाजमान्य वर्तन शिक्षकाकडून घडावे. समाजाचा नैतिक बौद्धीक व अध्यात्मिक स्तर उंचवण्याचा प्रयत्न

२) बौद्धीक व नैतिक जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न
३) सामाजिक समस्यांची जाणीव
४) राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य
५) सामाजिक कार्यात सहभाग
६) समाजविघातक कृत्यापासून स्वतःस दूर ठेवणे

* शिक्षकांची इतर आचार संहिता :-

१. सहकार्यांशी सन्मानाने वागणे
२. उच्च अधिकाऱ्यांकडे सहकाऱ्यासंदर्भात तक्रार करू नये
३. जात वंश, धर्म, लिंग याच्या विचार नको
४) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना समानतेची वागणूक
५) सयुक्त सभाना सहकार्य करावे

ज्ञान-दान हे शिक्षकाचे पवित्र कार्य आहे. आज कार्याला व्यावसायाचे पावित्र्य जपले तर या व्यवसायाचे श्रेष्ठत्व कायम ठेवण्यास निश्चित मदत होईल. आणि हे पावित्र्य जपण्याची जबाबदारी अर्थातच शिक्षकाची आहे.

आचार्य विनोबा भावे यांची शिक्षकांसाठी आचारसंहितेची तत्वे :-

१. प्रसिद्ध विचारवंत आचार्य विनोबा भावे यांनी आचार्य कुलातून शिक्षकांसाठी कशी आचारसंहिता असावी ते स्पष्ट केले आहे.

२. प्रत्येक शिक्षकांच्या ठिकाणी अध्ययन अध्यापनाची प्रवृत्ती जागी झाली पाहिजे आणि सातत्याने त्याचा विकास झाला पाहीजे.

३ संपर्कात येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांशी शिक्षकाने आत्मीयतेचे संबंध प्रस्थापित करावेत.



आणि सतत विद्यार्थ्यांच्या विकासाविषयीचे चिंतन करावे.

३) विद्यालयातील सर्व तरुण पिढी शील-संपन्न, तेजस्वी आणि विधायक प्रवृत्तीची होईल असा अभ्यासक्रम शिक्षकाने तयार करावा.

४) सामाजिक समस्या सोडविताना आपले स्वतःचे व परिसरातील इतर सदस्याचे नैतिक अधःपतन होणार नाही याची काळजी घ्यावी.

५) समाजात शांतता प्रस्थापित करण्यासाठी शिक्षकाने सदैव तत्पर असावे.

६) कोणत्याही समस्येच्या संदर्भात समाजाला मार्गदर्शन करण्याची पात्रता त्याच्या अंगी असावी.

७) समाजातील समस्यांचे चिंतन करून त्या सोडविण्यासाठी सहकार्यासाठीची संमती घेऊन त्यातून मार्ग काढण्याचा त्याने प्रयत्न करावा.

*) माध्यमिक शिक्षण कायद्यानुसार शिक्षकांची आचार संहितेची तत्वे.

१ 16 July 1981 च्या महाराष्ट्र शासनाच्या राज्यपत्रानुसार शिक्षकांसाठी पुढील प्रमाणे आचारसंहिता ठरविण्यात आली आहे. ही आचारसंहिता नियम क्रमांक २२ प्रमाणे आहे.

1) शैक्षणिक विचार आणि विविधतेच्या नावाखाली शिक्षकाने विचार स्वातंत्र्याचा गैरवापर करू नये.

2) संस्थेने अथवा व्यवस्थापक मंडळाने दिलेल्या सुविधा

शिक्षकांनी केला पाहीजे. विद्यार्थ्यांच्या वर्तनाची जडणघडण करण्याची जबाबदारी समाजाने शिक्षकावर टाकली आहे ती त्याने व्यवस्थितपणे पार पाडली पाहीजे.

आपल्या सहकारी शिक्षकाशी संबंध कसे असावेत या संबंधीही आचारसंहीतेतें काही सूचना केल्या आहेत शिक्षकांनी सहकारी शिक्षकांविषयी अनुदगार काढू नयेत.

विद्यार्थ्यांचा विकास घडवून आणणे ही पालकांची आणि शिक्षकांची संयुक्त जबाबदारी आहे केवळ शिक्षक किंवा केवळ पालक ही जबाबदारी पार पाडू शकणार नाहीत. विद्यार्थ्यांचा विकास साधण्यासाठी शिक्षकांनी पालकांचे सहकार्य मिळविले पाहीजे.

प्रचलित शिक्षण पद्धतीतील उणीवा जाणून घेऊन त्या दूर करण्यास प्रयत्न शिक्षकांनी केला पाहीजे अभ्यासक्रम पाठ्यपुस्तके यात उणीवा तसेच दोष असू शकतात शिक्षकांनी त्यासंबंधी संशोधन करून दोष दूर केले पाहीजेत.

अध्यापन व्यवसायात अनेक सेवक म्हणून काम करताना सर्व अटी व नियमांचे पालन शिक्षकांनी अत्यंत काटेकोरपणे केले पाहीजे. वरिष्ठांना योग्य ती पाहीजेत. व्यावसायात आवश्यक असणारी गुप्तता पाळली पाहीजे. व्यसन, अनैतिक वर्तन, भ्रष्टाचार यापासून दूर असले पाहीजे.

सध्याच्या बिकट सामाजिक वातावरणात चारित्र्य संपन्न आणि सत्प्रवृत्त पिढी तयार करणे ही कठीण गोष्ट आहे भावी पिढी सदाचार संपन्न सदगुणी कशी घडेल यासाठी शिक्षकांनी प्रयत्नशील असले पाहीजे. समाजातील इतर कोणत्याही व्यवसायाच्या पेक्षा शिक्षकी व्यवसाय भिन्न आहे या व्यावसायाच्या आणि समाजाच्या जडणघडणीच्या अतिशय जवळचा संबंध आहे समाजाने शिक्षकांवर टाकलेली ही जबाबदारी यथार्थ मानून आपल्या व्यवसायीची आचार सहीता टाकली



सर भावी पिढी घडविण्याचे एक महान कार्य शिक्षकांकडून उत्तम होऊ शकते थोडक्यात विद्यार्थी पालक, अधिकारी समाज आणि इतर संदर्भातील आचार संहिता आकृतीच्या साहाय्याने पुढील प्रमाणे मांडली आहे

* शिक्षकांची विदयार्थ्यांसंदर्भात आचारसंहिता :-

1) सर्व विदयार्थ्यांना समान । निःपक्षपाती वर्तन
2) विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यात पुढाकार
3) विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे
4) लोकशाहीची जाणीव निर्माण करणे.
5) विद्यार्थ्यांची स्वतः बदलांची गुप्त माहीती वाकगाज्याच्या हक्काची माहीती देणे.

शिक्षकाची पालकासंदर्भात आचार संहिता :-

1. पालकाबरोबर मित्रत्वाचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापणे
2. पाल्याच्या प्रगतीची माहीती देणे.
3. परस्परांच्या विचारांची देवाणघेवाण करणे.
4. पालकांचा सन्मान राखणे.

शिक्षकाची अधिकाऱ्या संदर्भात आचारसंहिता :-

1) व्यावसायिक जबाबदाऱ्या पार पाडणे
2) किचकट नियम बदलण्यासाठी सक्रीय सहभाग
3) संस्था विकासासाठी सहकार्याची भूमिका
4) धोरण ठरविण्यासाठी सहकार्य

शिक्षकाची समाज संदर्भात आचारसंहिता :-

1) विविध कार्यक्रमाची माहीती समाजास देणे

आणि साधन सामग्रींचा कोणत्याही कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या वैयक्तिक / व्यापारी व राजकीय हेतूसाठी उपयोग करणे निषिद्ध आहे.

३) सर्व शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी वागताना राजकीय सबबीवर चर्चा, धर्म, जात, वंश, भाषा, लिंग या सबबीवर अथवा अन्य खाजगी सबबीवर चर्चा किंवा भेदभाव करु नये.

४) शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे मुल्यमापन निपक्षपातीपणे किंवा कोणत्याही सबबीवर जाणून बुजून करुन कमी अथवा जास्त गुण देवू नये.

५) सुट्टीच्या किंवा रजेच्या काळात कर्मचाऱ्यांनी योग्य त्या अधिकाऱ्याला आपला पत्ता द्यावा.

६) शिक्षकाने कोणत्याही प्रकारचे खाजगी वर्ग चालवूनयेत. अथवा त्यात नोकरी करु नये.

७) शिक्षकाचे वर्तन विद्यार्थी- विद्यार्थींनीशी अथवा इतर कर्मचाऱ्यांशी शालीनतेचे असावे.

८) पूर्ण वेळ काम करणाऱ्या शिक्षकाने दुसऱ्या कोणत्याही शैक्षणीक, सांस्कृतिक किंवा वाङमयीन संस्थेत मोबदल्यात अथवा अंशवेळ नोकरी करु नये. परवानगी घेतल्यास असे काम दोनच तास करावे.

९) मादक पदार्थ, द्रव्ये इत्यादी संबंधीच्या कायद्याचे कडक पालन करावे.

* —— * —— *

Sansthamata Sushiladevi Salunkhe Mahila Shikshanshastra Mahavidyalaya, Tasgaon, Dist. Sangli, Pin. 416 312.

I/c. Principal,
Sansthamata Sushiladevi Salunkhe
Mahila Shikshanshastra Mahavidyala,
Tasgaon, Dist. Sangli, Pin. 416 312.

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार "

– शिक्षणमहर्षी प. पू. डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित,

# संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,

तासगाव, जि. सांगली

# प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, कु./सौ./श्रीमती ऊर्मिला रविंद्र पाटील Roll No-37 यांनी बी. एड्. सत्र I वर्ष 2021-22 मध्ये सदर प्रात्यक्षिक समाधानकारकपणे पूर्ण केलेले आहे.

विभाग प्रमुख

स्थळ : तासगाव

दिनांक : 17/10/२०२२

Sansthamata Sushiladevi Salunkhe Mahila Shikshanshastra Mahavidyalaya, Tasgaon, Dist. Sangli. Pin. 416 312

प्राचार्य
I/c. Principal,
Sansthamata Sushiladevi Salunkhe
Mahila Shikshanshastra Mahavidyala,
Tasgaon, Dist. Sangli. Pin. 416 312.

Internal Exam

[illegible]

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur's

**Sansthamata Sushiladevi Salunkhe Mahila Shikshanshastra Mahavidyalaya, Tasgaon.**

**Tutorial / Internal Annual Examination March / April - 20..........**

Name of Student कु. मलगर सोनाली Roll No.: 40 | Invigilator's Signature with Date: [signature]

Name of the Centre संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव

Name of the Examination अंतर्गत परीक्षा Date 2 ऑगस्ट 2023

Subject समावेशक शाळांची निर्मिती Paper No. — Section —

13/15

प्र.1 खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.

1) → बरोबर

2) → चूक

3) → बरोबर

3

→ **अपंगांसाठीच्या विविध सोयीसवलती पुढीलप्रमाणे :-**

① कृत्रिम अवयव व साधने पुरविणे -

अपंगांसाठी कॅलिपर्स, कृत्रिम अवयव, तीन चाकी सायकल, श्रवणयंत्र (कर्णबधिर लोकांसाठी), अंध व्यक्तींना चष्मे, 10 वी नंतर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना फेऱ्या कॅसेट दिल्या जातात. तसेच अर्थसहाय्य केले जाते.

② प्रवासी भाड्यात सवलत :

अंध, अस्थिव्यंग, अपंग, मतिमंद, कर्णबधिर, मनोविकृत व्यक्तींना दिलेल्या पत्राच्या आधारे एस.टी. प्रवासामध्ये भाड्यात 75% सवलत मिळते तर त्यांच्यासोबतच्या व्यक्तीस 50% सवलत दिली जाते.

③ स्वयंसेवी संस्थेतील काही व्यक्तींमार्फत अवयव (कृत्रिम) व साधने :

याद्वारे अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव, विविध साधने, श्रवणयंत्र दिले जाते तसेच मनोविकृत लोकांना साधनांसाठी 6 हजार तर कर्णबधिर, बहुविकलांग लोकांना 8 हजार इतके अर्थसहाय्य दिले जाते.

④ स्वयंसेवी संस्थांना मदत -

स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळा, कार्यशाळा तसेच इतर अपंगांसाठी कार्य करणाऱ्यांना केंद्र शासनामार्फत अनुदान दिले जाते. याद्वारे या संस्थांना प्रोत्साहन देणे हा या योजनेचा हेतू आहे.

⑤ अपंग पुनर्वसन केंद्र :

अपंग व्यक्तींचा शोध घेऊन त्यांचे ग्रामपंचायत, गट तसेच जिल्हास्तरावर पुनर्वसन केंद्रामार्फत

पुर्नवसन केले जाते. या योजनेमार्फत अपंगांना मोफत अथवा अल्प दरात अवयव पुरविले जातात. ही योजना अनेक जिल्ह्यात सुरु आहे. याव्दारे व्यवसायीक मुल्यमापन करुन अल्प दरात स्वयंरोजगाराचे अभ्यासक्रम राबविले जातात.

⑥ अपंगासाठी अभ्यासक्रमात राखीव जागा:
अनेक अभ्यासक्रमात अपंगांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत. तसेच शिक्षणशास्त्र व पदविका अभ्यासक्रमासाठी 3% आरक्षण ठेवण्यात आले आहे.

⑦ वसतिगृहात राखीव जागा:
समाजकल्याण मार्फत चालविण्यात येणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात 3% जागा अपंगांसाठी राखीव ठेवल्या जातात.

⑧ माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षेसाठी सवलती:
या विद्यार्थ्यांसाठी वाचक, लेखनिक तसेच 30 मिनिटे जादा वेळ घराजवळ परीक्षा केंद्र आलेख, नकाशे, आकृती काढण्यात गती कमी, गणित व शास्त्र हस्तपुस्तिकेऐवजी सुगम विषय देण्यात येतात.

